THE TIMES OF INDIA, NAGPUR
MONDAY, MARCH 6, 2023



# 'Optimism fading in youths, Dr Bang's book brings hope'

## Elkunchwar Releases Marathi Book

Chaitanya.Deshpande
@timesgroup.com

Madhu Kumre



Mahesh Elkunchwar (second from right) and others release Dr Abhay Bang's (right) book at Kavi Kalidas Hall, Persistent Systems, Gayatri Nagar on Sunday

**BOOK OF LIFE**

- Dr Abhay Bang is not only a well-known physician but also a prolific writer. He has authored several books on various subjects related to health, education, social welfare
- Often people are caught up with the question 'What to do with this life?'
- The recent book by Dr Bang delves with this question and its answer
- It's a collection of Dr Bang's articles and lectures delivered on different subjects
- Mostly youth-centric, this book has a message for all age groups

**Nagpur:** Today's youth is losing optimism due to different challenges and reasons and appears to have been lost. But, Dr Abhay Bang's book is a guide to life values for the young generation, said well-known playwright and Sahitya Akademi Award winner professor Mahesh Elkunchwar. He released a Marathi book 'Yaa Jeevanache Kaay Karu?' (What should I do with this life?) by well-known social activist and founder of Shodhgram, Padma Shri Dr Abhay Bang on Sunday.

"The answer to the question 'What should I do with this life?' should be 'Live it fully.' However, one should live life in a way that benefits the world, with sincerity and authenticity. Living life with complete dedication is a form of meditation," said Elkunchwar.

The playwright said the book meets the thoughts of Vinoba Bhave and Mahatma Gandhi. Praising Dr Bang's quality writing, he said, "His style is straightforward and simple and the book will tempt one to read again and again."

The event was organized at Kalidas auditorium of Persistent Systems by Rajhans Publications. Naresh Sabjiwale was present on behalf of the publishers while Suresh Pandharipande commented on the book as a "beautiful depiction of knowledge, action and devotion".

**LIFE VALUES**

"If we want to bring about change, then it should start from within ourselves, as this is evident on every page of this book. The book includes two articles on Vinoba Bhave. One discusses Gandhi's 'Satyagraha' and the other discusses Vinoba's methods of work after achieving Independence. The book will help many dispel all doubts about their methodologies," said Pandharipande.

Dr Bang said that the book is nothing but a conversation with today's youths. "Due to the advancement of medical science, lifespan has increased. However, if there is no purpose to this extended lifespan, then life will be hell," he said.

"I have tried to answer the question of how to make the most of this extended lifespan. Vinoba's trinity of human nature, duty, and the duty towards the universe can help today's youth," said Dr Bang who had the privilege to study in schools started by Mahatma Gandhi in Sevagram and later work under the guidance of Vinoba Bhave in Paonar.

Amrit and Aarti Bang, Damayanti Pandharipande, Sameer Bendre of Persistent System, and others were present on the occasion.

TheHitavada
Nagpur City Line | 2023-03-06 | Page- 7
ehitavada.com

# Living life with pure heart is a spiritual practice: Elkunchwar

■ **Staff Reporter**

"LIVE. This should be the answer to the question 'What should I do with life?'. One should live life putting one's heart in it, meaningfully, and hoestly. Living life with a pure heart is a spiritual practice," observed noted playwright Mahesh Elkunchwar. He was speaking at the release of noted social worker 'Padma Shri' Dr Abhay Bang's book 'Yaa Jiwanache Kaay Karu?'.

The author Dr Abhay Bang, Suresh Pandharipande, Naresh Sabjiwale of Rajhans Prakashan shared the dais in the programme held at Kavikulguru Kalidas Sabhagruha in Persistent Systems here on Sunday. At the outset, Jaya Sabjiwale read out the message from Dilip Majgaonkar of Rajhans Prakashan. The publishing house also felicitated Dr Abhay Bang. Pradeep Datey, President of Vidarbha Sahitya Sangh; Ashutosh Shewalkar, Sarpotdar also felicitated Dr Bang.

After the release of the book, Elkunchwar said that Dr Bang's book sensitised the reader on value of life. "In the book, we meet Acharya Vinoba Bhave and Mahatma Gandhi's thoughts and we realise the connect and relevance," he said. He also appreciated Dr Bang for lucid style while writing a thought-provoking book. He also commented on the fading optimism in the present context.

Pandharipande said that the book was a beautiful blend of knowledge, work, and devotion. "It



Naresh Sabjiwale, Suresh Pandharipande, noted playwright Mahesh Elkunchwar, and author 'Parma Shri' Dr Abhay Bang at the release of book 'Yaa Jiwanache Kaay Karu?'.
(Pic by Anil Futane)

speaks of leading the change with oneself," he added. Dr Abhay Bang said, "Life expectancy has increased with advancements in the field of medicine. However, if this increased life does not have any purpose, what will happen?," he wondered. Hence, he added, how to live life should be the question one should ask instead of how much should one live.

Earlier, Naresh Sabjiwale made introductory remarks. Vrushali Deshpande conducted the proceedings and Sabjiwale proposed a vote of thanks.

Amrut and Aarti Bang, Damayanti Pandharipande, and Sameer Bendre, Chief People's Officer of Persistent Systems, were present prominently on this occasion.

Powered by iDocuments

# 'Optimism fading in youths, Dr Bang's book brings hope'

## Elkunchwar Releases Marathi Book

Chaitanya.Deshpande
@timesgroup.com

Madhu Kumre



Mahesh Elkunchwar (second from right) and others release Dr Abhay Bang's (right) book at Kavi Kalidas Hall, Persistent Systems, Gayatri Nagar on Sunday

### BOOK OF LIFE

- Dr Abhay Bang is not only a well-known physician but also a prolific writer. He has authored several books on various subjects related to health, education, social welfare
- Often people are caught up with the question 'What to do with this life?'
- The recent book by Dr Bang delves with this question and its answer
- It's a collection of Dr Bang's articles and lectures delivered on different subjects
- Mostly youth-centric, this book has a message for all age groups

**Nagpur:** Today's youth is losing optimism due to different challenges and reasons and appears to have been lost. But, Dr Abhay Bang's book is a guide to life values for the young generation, said well-known playwright and Sahitya Akademi Award winner professor Mahesh Elkunchwar. He released a Marathi book 'Yaa Jeevanache Kaay Karu?' (What should I do with this life?) by well-known social activist and founder of Shodhgram, Padma Shri Dr Abhay Bang on Sunday.

"The answer to the question 'What should I do with this life?' should be 'Live it fully.' However, one should live life in a way that benefits the world, with sincerity and authenticity. Living life with complete dedication is a form of meditation," said Elkunchwar.

The playwright said the book meets the thoughts of Vinoba Bhave and Mahatma Gandhi. Praising Dr Bang's quality writing, he said, "His style is straightforward and simple and the book will tempt one to read again and again."

The event was organized at Kalidas auditorium of Persistent Systems by Rajhans Publications. Naresh Sabjiwale was present on behalf of the publishers while Suresh Pandharipande commented on the book as a "beautiful depiction of knowledge, action and devotion".

### LIFE VALUES

"If we want to bring about change, then it should start from within ourselves, as this is evident on every page of this book. The book includes two articles on Vinoba Bhave. One discusses Gandhi's 'Satyagraha' and the other discusses Vinoba's methods of work after achieving Independence. The book will help many dispel all doubts about their methodologies," said Pandharipande.

Dr Bang said that the book is nothing but a conversation with today's youths. "Due to the advancement of medical science, lifespan has increased. However, if there is no purpose to this extended lifespan, then life will be hell," he said.

"I have tried to answer the question of how to make the most of this extended lifespan. Vinoba's trinity of human nature, duty, and the duty towards the universe can help today's youth," said Dr Bang who had the privilege to study in schools started by Mahatma Gandhi in Sevagram and later work under the guidance of Vinoba Bhave in Paonar.

Amrit and Aarti Bang, Damayanti Pandharipande, Sameer Bendre of Persistent System, and others were present on the occasion.

सकाळ

# डाव्या-उजव्यांच्या कळपात स्वातंत्र्य घालवायचे नाही

## प्रा. महेश एलकुंचवार : डॉ. अभय बंग लिखित पुस्तकाचे प्रकाशन



नागपूर : या जीवनाचे काय करू?... आणि निवडक या पुस्तकाचे प्रकाशन करताना (डावीकडून) राजहंस प्रकाशनाचे नरेश सबजीवाले, सुरेश पांढरीपांडे, प्रा. महेश एलकुंचवार आणि डॉ. अभय बंग.

▸ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ५ : मला आदर्शवादाची ॲलर्जी आहे. आदर्शवादाचे हळूहळू संस्थान, नियम, हरूप तयार होतो. त्यामुळे, त्यांच्याप्रमाणे तुम्हाला वागावे लागते. अशा आदर्शवादाच्या डाव्या आणि उजव्या घोळक्यात अनेकांना सुरक्षित वाटते. अशी सुरक्षितता मला नको. या सुरक्षेवर मी किती काळ टिकणार, हा प्रश्नच आहे. कुणाच्या कळपात जाऊन मला माझे स्वातंत्र्य घालवायचे नाही, असे मत ज्येष्ठ नाटककार प्रा. महेश एलकुंचवार यांनी व्यक्त केले.

राजहंस प्रकाशनातर्फे डॉ. अभय बंग लिखित 'या जीवनाचे काय करू?.. आणि निवडक' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. परसिस्टंट सिस्टिम्सच्या कवी कुलगुरू कालिदास सभागृहात रविवारी सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध समाजसेवक, पद्मश्री अभय बंग, सुरेश पांढरीपांडे यांच्यासह राजहंस प्रकाशनचे नरेश सबजीवाले उपस्थित होते.

प्रा. महेश एलकुंचवार यांनी मानवी जीवन, समाज आणि मी स्वत: अशा विविध पैलूंना आपल्या विशेष शैलीत स्पर्श केला. मूळ आदर्शाबाबत कुणीही विचार करीत नाही. काही मूल्ये ही त्रिकालवादी आहेत. मात्र, तेच आपण पाळत नाही. आपण फक्त वैचारिकतेचा अवडंबर वाजवतो. ही जीवनपद्धती हाताबाहेर गेली आहे. पर्यावरण, धर्म या गोष्टी वापरून टाकून दिल्या जातात. आज प्रत्येक गोष्ट वापरण्यासाठी आहे असे चलन झाले आहे. त्यामुळे, अच्छेदीन समोर आहे, असे मला वाटत नाही, असेही ते म्हणाले.

सुरेश पांढरीपांडे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक नरेश सबजीवाले यांनी, सूत्रसंचालन वृषाली देशपांडे यांनी केले.

सोहळ्याला विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, कार्याध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, सरचिटणीस विलास मानेकर, अमृत बंग, आरती बंग, दमयंती पांढरीपांडे, चंद्रकांत चत्रे, समीर बेंद्रे, आशुतोष शेवाळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### विनोबांच्या त्रिसूत्रीचा आधार : डॉ. अभय बंग

वैद्यकीय तंत्रज्ञान प्रगत झाल्याने आयुष्यमान वाढले आहे. परंतु, या वाढलेल्या आयुष्याला जर हेतू नसेल तर काय होईल. कदाचित ते 'हेल' होईल, असे डॉ अभय बंग म्हणाले. त्यामुळे, किती जगायचे हा विचार नसावा तर कसे जगावे हा प्रश्न आहे. सध्या प्रश्न आयोजनाचा नसून 'प्रयोजनाचा' आहे. स्वभाव, स्वधर्म आणि युगधर्म या विनोबांच्या त्रिसूत्रीचा आधार घेता येऊ शकेल.

पुण्य नगरी

# निखळ जीवन जगणे एकप्रकारची तपश्चर्या : एलकुंचवार

## डॉ. अभय बंग यांच्या 'या जीवनाचे काय करू?' पुस्तकाचे प्रकाशन

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



**नागपूर :** 'या जीवनाचे काय करू?' या प्रश्नाचे उत्तर हे 'जगू' असे असावे. परंतु, जीवन जगताना ते मनापासून, सर्वार्थाने, प्रामाणिकपणे जगावे. जीवन निखळ पद्धतीने जगणे ही एकप्रकारे तपश्चर्या आहे, असे मत ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांनी व्यक्त केले. गडचिरोली येथील शोधग्रामचे संस्थापक, लेखक पद्मश्री डॉ. अभय बंग लिखित व राजहंस प्रकाशनद्वारे प्रकाशित 'या जीवनाचे काय करू?' आणि 'निवडक' या पुस्तकांचे प्रकाशन रविवारी (ता. ५) परसिस्टंट सिस्टिम येथील कवी कुलगुरू कालिदास सभागृहात एलकुंचवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला डॉ. अभय बंग यांच्यासह सुरेश पांढरीपांडे, राजहंस प्रकाशनचे नरेश सब्जीवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. एलकुंचवार म्हणाले, अभय बंग यांचे पुस्तक जीवन मूल्यांची जाण करून देणारे आणि पथदर्शक आहे. त्यात विनोबा भावे आणि महात्मा गांधी यांच्या विचारांची भेट होते आणि सुसंगती समजून येते. सुरेश पांढरीपांडे म्हणाले, ज्ञान, कर्म आणि भक्ती यांचे सुंदर प्रतिबिंब या पुस्तकातून दिसून येते. सुरुवातीला राजहंस प्रकाशनचे दिलीप माजगावकर यांचा शुभेच्छा संदेश जया सब्जीवाले यांनी वाचून दाखविला. यावेळी राजहंस प्रकाशनतर्फे डॉ. अभय बंग यांचा सत्कार करण्यात आला. वैद्यकीय तंत्रज्ञान प्रगत झाल्याने आयुष्यमान वाढले आहे. परंतु, या वाढलेल्या आयुष्याला जर हेतू नसेल तर काय होईल. कदाचित ते 'नरक' होईल, असे डॉ. अभय बंग आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले. त्यामुळे किती जगायचे याऐवजी कसे जगावे, हा विचार असावा. स्वभाव, स्वधर्म आणि युगधर्म या विनोबांच्या त्रिसूत्रींचा आधार घेता येऊ शकेल, असे ते म्हणाले. मंचावर विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, आशुतोष शेवाळकर, सरपोतदार यांची उपस्थिती होती. या पुस्तकाच्या माध्यमातून आपल्या मनातील प्रश्नांची उत्तरे शोधण्याची संधी युवा पिढीला मिळणार आहे, असे मत नरेश सब्जीवाले यांनी प्रास्ताविक करताना व्यक्त केले.

सूत्रसंचालन वृषाली देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाला अमृत व आरती बंग, दमयंती पांढरीपांडे, परसिस्टंट सिस्टिमचे समीर बेंद्रे आदींची उपस्थिती होती.

# डॉ. अभय बंग यांची जीवनपद्धती प्रेरणादायी - महेश एलकुंचवार

## ‘या जीवनाचे काय करू?...आणि निवडक’ पुस्तकाचे प्रकाशन



**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** सध्याचे दिवस हे पैशाला प्रतिष्ठा देणार आहेत. बाबा, महाराजांची चलती असून अध्यात्मिक बाजारपेठ झाली आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. अभय बंग यांनी त्यांचे कार्य एकरूप होऊन केले आहे. त्यांचे हे निखळ जगणे तपश्चर्या आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक महेश एलकुंचवार यांनी केले.

> “महाराष्ट्रातील तरुणांना उद्देशून हे पुस्तक लिहिले आहे. या विषयावर पुण्यात तरुणांपुढे भाषण झाले होते. भारतातील तरुण पिढीचा दरारा वैश्विक झाला आहे.
>
> -डॉ. अभय बंग

सुप्रसिद्ध समाजसेवक, ‘शोधग्राम’चे संस्थापक व लेखक पद्मश्री डॉ. अभय बंग लिखित ‘या जीवनाचे काय करू ?... आणि निवडक’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा कवी कुलगुरू कालिदास सभागृह, परसिस्टंट सिस्टिम्स, गायत्रीनगर येथे आयोजित करण्यात आला होता. रविवारी राजहंस प्रकाशनतर्फे आयोजित या कार्यक्रमात ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमाला डॉ. अभय बंग यांच्यासह सुरेश पांढरीपांडे आणि राजहंस प्रकाशनचे नरेश सबजीवाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

एलकुंचवार म्हणाले, आज पैसा आणि पैशामुळे येणारी प्रतिष्ठा एवढे एकच मूल्य आहे. ही मूल्यव्यवस्था चूक आहे हे ज्या दिवशी कळेल, जेव्हा आपली प्रतिष्ठा पैशांशी संबंधित राहणार नाही, ज्ञानाशी संबंधित राहील हे आम्हाला कळेल तेव्हाच काहीतरी बदल होऊ शकेल. जीवन जगताना ते मनापासून, सर्वार्थाने, प्रामाणिकपणे जगावे. डॉ. अभय बंग यांची लेखनशैली सुंदर आहे. कारण, ते प्रामाणिक आहे. वैचारिक गोंधळ नाही. त्यामुळे साधी आणि सरळ भाषा आहे. इतका साधेपणा पुष्कळ लेखकांना कमवावा लागतो. साधे लिहिणे कठीण गोष्ट असते. असे लेखन कधीच शिळे होत नाही. मी या पुस्तकाकडे पथदर्शक, दीप म्हणून बघतो, असेही ते म्हणाले.

ज्ञान, कर्म आणि भक्ती याचे सुंदर प्रतिबिंब या पुस्तकातून दिसून येते, असे मत प्रा. सुरेश पांढरीपांडे यांनी व्यक्त केले. बदल घडवायचा असेल तर त्याची सुरुवात ही स्वतःपासून व्हावी असे या पुस्तकाच्या प्रत्येक पानात आहे असे ते म्हणाले. या पुस्तकात विनोबा भावे यांच्यावर दोन लेख असून त्यांच्या जीवनावरील लेखात गांधींचा ‘सत्याग्रह’ आणि स्वातंत्र्यापश्चात विनोबा यांची ‘सत्यग्रही’ या त्यांच्या कार्यपद्धतीबाबत काहींच्या शंकांचे निरसन होते, असे देखील ते म्हणाले. वृषाली देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

# निखळ जगणे ही तपश्चर्या; जगताना मनापासून जगा

## महेश एलकुंचवार : डॉ. अभय बंग यांच्या 'या जीवनाचे काय करू' पुस्तकाचे प्रकाशन

लोकशाही वार्ता/नागपूर

'या जीवनाचे काय करू' या प्रश्नाचे उत्तर हे 'जगू' असे असावे परंतु, जीवन जगताना ते मनापासून, सर्वार्थाने, प्रामाणिकपणे जगावे. जीवन हे निखळ पद्धतीने जगणे ही एकप्रकारे तपश्चर्या आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांनी व्यक्त केले. सुप्रसिद्ध समाजसेवक, शोधग्रामचे संस्थापक व लेखक पद्मश्री डॉ. अभय बंग लिखित 'या जीवनाचे काय करू... आणि निवडक' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा कवी कुलगुरू कालिदास सभागृह, परसिस्टंट सिस्टिम्स, गायत्रीनगर येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

राजहंस प्रकाशनतर्फे रविवारी (ता. ५ मार्च) रोजी, आयोजित या कार्यक्रमात ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमाला डॉ. अभय बंग यांच्यासह सुरेश पांढरीपांडे आणि



राजहंस प्रकाशनचे नरेश सबजीवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे ते म्हणाले, अभय बंग यांचे पुस्तक जीवन मूल्यांची जाण करून देणारे आणि पथदर्शक असे आहे. त्यात विनोबा भावे आणि महात्मा गांधी यांच्या विचारांची भेट होते आणि सुसंगतता समजून येते. हे पुस्तक अनेकदा वाचण्याचा मोह होऊ शकतो, असे सांगत बंग यांच्या सरळ, सोप्या शैली मधील दर्जेदार लिखाणाचे कौतुक केले. ज्ञान, कर्म आणि भक्ती याचे सुंदर प्रतिबिंब या पुस्तकातून दिसून येते, असे मत सुरेश पांढरीपांडे यांनी व्यक्त केले. बदल घडवायचा असेल तर त्याची सुरुवात ही स्वतःपासून व्हावी असे या पुस्तकाच्या प्रत्येक पानात आहे असे ते म्हणाले. याला दुजोरा देण्यासाठी त्यांनी गांधीजींच्या जीवनातील एक गोष्टदेखील सांगितली. या पुस्तकात विनोबा भावे यांच्यावर दोन लेख असून त्यांच्या जीवनावरील लेखात गांधींचा 'सत्याग्रह' आणि स्वातंत्र्य पश्चात विनोबा यांची 'सत्यग्राही' या त्यांच्या कार्यपद्धती बाबत काहींच्या शंकांचे निरसन होते असे देखील ते म्हणाले. सुरुवातीला राजहंस प्रकाशनचे दिलीप माजगावकर यांचा शुभेच्छा संदेश जया सबजीवाले यांनी वाचून दाखविला. त्यांनी हे पुस्तक प्रवाही, प्रगल्भ आणीबाणी नितळ असल्याचे सांगून विचारांच्या जोडीला पांडित्य दिसून येते, असे मनोगत त्यांनी त्यात व्यक्त केले आहे. राजहंस प्रकाशनतर्फे यावेळी डॉ. अभय बंग यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, आशुतोष शेवाळकर, सरपोतदार यांची उपस्थिती होती. डॉ. अभय बंग यांनी विविध विषयांवर लिहिलेल्या लेखांचा व दिलेल्या भाषणांचा संग्रह असलेल्या 'या जीवनाचे काय करू... आणि निवडक' या पुस्तकाच्या माध्यमातून आपल्या मनातील प्रश्नांची उत्तरे शोधण्याची संधी या निमित्ताने युवापिढीला मिळणार आहे, असे मत राजहंस प्रकाशनचे नरेश सबजीवाले यांनी प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन करताना व्यक्त केले. वृषाली देशपांडे यांनी संचालन केले. कार्यक्रमाला अमृत व आरती बंग, दमयंती पंढरीपांडे, परसिस्टंट सिस्टिमचे समीर बेंद्रे आदींची उपस्थिती होती.

### हे पुस्तक म्हणजे युवांशी साधलेला संवाद - डॉ. अभय बंग

वैद्यकीय तंत्रज्ञान प्रगत झाल्याने आयुष्यमान वाढले आहे. परंतु या वाढलेल्या आयुष्याला जर हेतू नसेल तर काय होईल. कदाचित ते 'हेल' होईल, असे डॉ. अभय बंग म्हणाले. त्यामुळे किती जगायचे हा विचार नसावा तर कसे जगावे हा प्रश्न आहे. सध्या प्रश्न आयोजनाचा नसून 'प्रयोजनाचा' आहे, असे ते म्हणाले. स्वभाव, स्वधर्म आणि युगधर्म या विनोबांच्या त्रिसूत्रीचा आधार घेता येऊ शकेल, असे ते म्हणाले.



प्रकाशन सोहळ्यात बोलताना ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार. मंचावर नरेश सबजीवाले, डॉ. सुरेश पांढरीपांडे आणि पुस्तकाचे लेखक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग.

# निखळ जगणे ही तपश्चर्याच

■ महेश एलकुंचवार यांनी मांडला विचार; डॉ. अभय बंग यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

'आपल्याला जीवन सर्वांगाने स्वीकारता आले पाहिजे. डोळे उघडे ठेवून जगता आले पाहिजे. कोणत्याही सुखदुःखांना चिकटून न राहता आयुष्य पार करून पलीकडे जाणे जमले पाहिजे. आयुष्य असे निखळपणे जगणे ही एक प्रकारची तपश्चर्याच आहे', असे मत ज्येष्ठ नाटककार महेश- एलकुंचवार यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांच्या 'या जगण्याचे काय करू?' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. पर्सिस्टंट सिस्टिम्स लिमिटेडच्या कालिदास सभागृहात रविवारी हा कार्यक्रम झाला. मंचावर डॉ. बंग यांच्यासह ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. सुरेश पांढरीपांडे आणि राजहंस प्रकाशनचे नरेश सबजीवाले उपस्थित होते.

महेश एलकुंचावार म्हणाले, 'चांगल्या गोष्टी समाजात हळूहळू रुजतात आणि त्यांची फळे मिळण्यास तिसरी पिढी जन्माला यावी लागते. विषवल्ली तावडतोब पसरते. डॉ. अभय बंग यांचे काम मूलभूत परिणाम करणारे आहे आणि त्या कामाचा आवाका या पुस्तकातून आपल्याला कळतो. आदर्शवाद स्वीकारला की तुम्ही एका गटाशी बांधले जाता आणि त्यांचे नियम तुम्हाला स्वीकारावे लागतात. तसे न केल्यास तुम्ही दूर फेकले जाण्याची भीती असते. आपल्याला एकटेपणाची फार भीती वाटते आणि घोळक्यात सुरक्षित वाटते. मात्र, मला माझे स्वातंत्र्य हवे असल्याने मी कधी अशा कळपांमध्ये गेलो नाही.'

'आपण आडमुठ्या पद्धतीने सगळे नष्ट करीत चाललो आहोत. नव्या पिढीच्या भवितव्याबद्दल मी फारसा आशावादी नाही. सगळी प्रतिष्ठा पैशाशी निगडीत झाली आहे. व्यक्तीला ज्ञानावर आधारित प्रतिष्ठा मिळणे सुरू झाल्यास सध्याच्या परिस्थितीत काही चांगले बदल होतील', असेही एलकुंचवार यांनी नमूद केले.

'डॉ. अभय बंग यांच्या पुस्तकात ज्ञान, कर्म आणि भक्तीचे प्रतिबिंब दिसून येते. या भक्तीचा आशय हा सेवेचा धर्म आहे. शब्दांची शक्ती ही तपस्येतून जन्माला येते. तपस्येचे हे दर्शन या पुस्तकात घडते', असे डॉ. पांढरीपांडे म्हणाले. आपण सगळे जण सत्याच्या जाणिवेला पारखे झालो आहोत, अशी खंतही त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली.

प्रास्ताविक नरेश सबजीवाले यांनी केले. जया सबजीवाले यांनी राजहंसचे दिलीप माजगावकर यांचे या डॉ. बंग यांना पाठविलेले शुभेच्छापर पत्र वाचून दाखविले. सूत्रसंचालन वृषाली देशपांडे यांनी केले.

## प्रश्न आहे जगण्याच्या प्रयोजनाचा : डॉ. बंग

माणसाचे आयुर्मान आता वाढत जाणार आहे आणि अमरत्व हे असाध्य नाही याबाबत अनेक वैज्ञानिकांची खात्री आहे. दीर्घायुष्य मिळेलही पण त्या आयुष्याचे करायचे काय हा प्रश्न निर्माण होणार आहे. जीवनाला हेतू नसेल तर जगण्याचा नरक होईल. भारतीय मध्यमवर्गीय तरुणांना आता सगळे काही मिळते आहे. आपल्या तरुणांचा दर्जा आता वैश्विक झाला आहे. त्यामुळे, प्रश्न आता जगण्याच्या आयोजनाचा नसून प्रयोजनाचा आहे. त्याचा शोध प्रत्येकाने घेतला पाहिजे, असे डॉ. बंग यावेळी म्हणाले. विसाव्या शतकातील सर्वात मोठे साहित्यिक विनोबा भावे होते. आजवरच्या मराठी साहित्यात ज्ञानोबा, तुकोबा आणि विनोबा हे सार्वकालिक श्रेष्ठ साहित्यिक आहेत. महात्मा गांधी हे विसाव्या शतकातीलच नव्हे तर २१व्या शतकाचेही महानायक आहेत. आजच्या आर्थिक विषमता, द्वेष आणि पर्यावरणऱ्हासाच्या काळात गांधीजी अधिकच संयुक्तिक ठरत आहेत, असेही मत त्यांनी मांडले.